# निविदेच्या अटी व शर्ती

## ई निविदा सुचना क्र. 01 /2026-2027

## (पहिली वेळ)

## ई निविदा करिता

अमरावती जिल्हा परिषदेचे वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती हे जिल्हा परिषद अमरावती मुख्यालय परिसर व शिक्षणाधिकारी /कृर्षी कार्यालयातील/सर्व शिक्षा अभियान व मा.मु.का.अ. यांचे निवासस्थानातील कार्यालय क्रं. 2 परिसरातील साफसफाई करणे करीता खालील प्रमाणे http://Mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्रं. | विभागाचे नाव | लेखाशिर्षक व वर्ष | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्यालय जिल्हा परिषद अमरावती | जिल्हा निधी 2515-101-53 जिल्हा परिषद इमारत परिसरात सुरक्षा रक्षक मानधन व परिसर स्वच्छता | मुख्यालया अंतर्गत सर्व कार्यालये जिल्हा परिषद अमरावती व शिक्षणाधिकारी/ समग्र शिक्षा अभियान/कृर्षी/ मा.मु.का.अ.निवास्थानामधील कार्यालय क्रं २ व परिसरातील साफसफाई करणे | 60,00,000/- | 6000/- | 60000/- |

अटी व शर्ती

1) ई निविदा प्रसिध्दी दिनांका नंतर निविदा विक्रीची तारीख 1/9/26 ते 15/9/26 पर्यंत राहील व निविदा स्विकृतीचा दिनांक 15 /09/2026 वेळ सायंकाळी 5.45 पर्यंत स्विकारण्यात येईल. सिलबंद निविदा उघडण्याचा दि. 16 /09/2026 रोजी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येईल.

2) निविदा फार्म विकत घेतांना कंत्राटदाराने जि.प. पंजीकृत प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर कराव्यात. जि.प. मान्यता प्राप्त कंत्राटदारांना निविदा फी ची पावती सादर करावी.

3) निविदा मंजुर झाल्यावर प्रपत्र ब मधील एकुण रक्कमेच्या 2 टक्के सुरक्षा ठेव **मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद अमरावती** यांचे नावे ऑनलाईन जमा करण्यात यावा व FDR स्विकारल्या जाणार नाही आणि नियमानुसार आवश्यक रक्कमेचे 500/- रुपयांचे मुद्रांक पेपर वर करारनामा करुन द्यावा लागेल.

4) सदर निविदा फी इसार फी (EMD) RTGS/NEFT व्दारे भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र (Asa Part of E-Tendering document and process) संबंधित RTGS/NEFT चा युनिक ट्रान्झंक्शन रजिस्टेशन (UTR) क्रमांक नोंदवुन तांत्रिक लिफाफया सोबत अपलोड करण्यास निविदाकारांना निविदा सुचनेव्दारे सुचित करण्यात येत आहे. निविदा फी ना परतावा राहील.

5) संबंधित निविदा भरणा-या संस्थेची मागील **तीन वर्षांची उलाढाल कमीत-कमी रु. 60 लक्ष** किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक राहील.सदर प्रमाणपत्र **CA कडुन स्वांक्षाकीत** करणे आवश्यक राहील.

Scanned with Cam

6) निविदा भरणा-या संस्थेकडे **GST नंबर (प्रमाणपत्र) असणे आवश्यक आहे**. सदर प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक राहील.तसेच संबंधित संस्थेचे देयकातुन कार्यालयाला मार्फत देय बिलाच्या रक्कमेतुन 2% GST वं 2% आयकर कपात करण्यात येईल.उर्वरीत नियमानुसार GST सदर संस्थेला भरावा लागेल.

7) संबंधित निविदा भरणारी संस्था काळया यादीत नसावी.याबाबतचे स्वयंघोषणा प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक राहील अन्यथा बाद करण्यात येईल

8) पॅन कार्ड (Pan Card) व मागील तीन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे व ऑडीट रिपोर्ट CA कडुन स्वांक्षाकीत निविदेसोबतु अपलोड करणे आवश्यक राहील.

8) सफाई कामगार निविदा भरणा-या पुरवठादाराने कामगार कायद्यातील सर्व अटी व शर्ती ची पुर्तता करणे आवश्यक आहे तसेच सदर कर्मचा-यासाठी राज्य कामगार विमा योजना भविष्य निर्वाह निधी बोनस ॲक्ट ग्रॅच्युइटी ॲक्ट घरभाडे भत्ता ॲक्ट ई कायदेशीर नियमाचे पालन करुन तरतुदीमधील नियमानुसार वेळोवेळी भरणा हा कंत्राटदार यांनी करावयाचा आहे.

9) सफाई कामगाराचे वेतन व भत्ते यांचा भार हा कंत्राटदाराचा असेलत्याबाबत संस्थेचा कोणताही संबध राहणार नाही.

10) निविदाधारकास ई पी.एफ. (EPF) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

11) कंत्राटदाराने सफाई कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने वेळोवळी ठरवून दिलेले किमान मासिक वेतन द्यावे. सफाई कामगाराचे देण्यात येणाऱ्या किमान वेतनाची खात्री करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील. किमान वेतनापेक्षा कमी दर सादर केल्यास संबंधित निविदाकाराच्या निविदा रद्द करण्यात

12) सफाई कामगार यांचे दैनिक हजेरी पुस्तक ठेवावे सदर हजेरी पुस्तकाच्या छायांकीत प्रती प्रत्येक महीण्याचे देयका सोबत जोडणे बंधनकारक राहील.

13) कंत्राटदाराचे सफाई कामगार यांचा स्वराज्य संस्थेचा कोणताही संबंध असणार नाही. तसेच या स्वराज्य संस्थेत काम केल्यामुळे भविष्यात या स्वराज्य संस्थेच्या आस्थापनेवर समावून घेण्याकरीता सदर सफाई कामगाराचा कोणताही दावा करता येणार नाही.

14) सफाई कामगार संबधीचे विवीध विवादासाठी कंत्राटदार स्वतः जबाबदार राहतील. कार्यालयाशी त्याचा कोणताही संबंध राहणार नाही.

15) कामाच्या वेळेत सफाई कामगार झालेल्या इजा व अपघातांसाठी कार्यालय जबाबदार राहणार नसून त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील, याकरीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही काम करतांना कामगारांना झालेल्या अपघातासाठी संस्था कोणतीही भरपाई देणार नाही.

16) अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकांनी अटी व शर्तीवर (निविदेसोबतचे बंधपत्र) अधिकृत स्वाक्षरी शिक्का सह करुन अपलोड करावे.आवश्यक तेथे मुखत्यारपत्राची प्रत जोडावी. वरील (अ) लिफाफा क्र.1 मधील 1 ते 12 मध्ये नमुद केलेल्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीस्कॅन करुन त्या निविदा धारकांनी अपलोड कराव्यात. वरील (अ) लिफाफा क्र.1 मधील 1 ते 12 मध्ये व ई-निविदे मध्ये नमुद केलेली कागदपत्र तसेच बयाणा रक्कमे बाबतची पुर्तता होत नसल्यास निविदा वैध ठरवली जाणार नाही.व त्या निविदाधारकांचा दराचा लिफाफा उघडण्यात येणार नाही.

17) नोंदणीकृत मक्तेदारानी अधिकृत डी.एस.सी. (Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेवुन http:// Mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वतः नोंदणी करुन ई-निविदा पध्दतीनेच निविदा सादर करावी.

18) नोंदनिकृत कंत्राटदार यांचेकडे जे कर्मचारी साफसफाईचे काम करीत आहे त्यांना ड्रेस कोर्ड अनिवार्य आहे

19) दिनांक 12/2/2016 च्या शासन निर्णयानुसार performance security निविदेसोबत सादर करावे लागेल.

-

Scanned with Cam

20) पहिल्या लिफाफयामध्ये बयाना रक्कमेचा ड्राफ्ट, जि.प. पंजीकृत प्रमाणपत्र व मागील वर्षाचे जी. एस. टी. क्लिअरन्स प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र, पॅनकार्ड, ची छायांकीत प्रत अशा प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत सत्यप्रती जोडाव्यात, प्रमाणपत्र सांक्षांकित नसल्यास किंवा मागीतलेली कोणतेही कागदपत्रे लिफाफा क्रमांक (1) मध्ये न आढळल्यास संबंधीताची निविदा रद्द करण्यात येईल. त्यामुळे कंत्राटदरांनी दक्षता घ्यावी.

21) दुसऱ्या लिफाफयामध्ये दराचा निविदा फार्म असावा. सदर्हू लिफाफयामध्ये बी - 1 प्रपत्रातील बुकलेट स्विकारण्यात येईल. तसेच अतिरिक्त सुरक्षा ठेव (performance security) सादर करावी.

22) कोणतेही कारण न सांगता अथवा कोणतेही कारण न देता एक किंवा ई निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी राखुन ठेवले आहे.

23) निधीचे उपलब्धते नुसारच कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित केले जाईल. तसेच निधी उपलब्धते नुसारच देयकाचे शोधन करण्यात येईल.

24) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर त्यावरील काम करणाऱ्या कामगारांचा विमा, विमा संचालनालय, मंत्रालय, म.रा.मुंबई यांचेकडे काढणे बंधनकारक राहील. अन्यथा कंत्राटदाराचे कामाचे देयकामधुन 1 टक्के रक्कम कपात करण्यात येईल.

25) कंत्राटदारास नियमित साफसफाईचे काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंडनिय कार्यवाही करण्यात येईल.

26) कंत्राटदाराने विहीत मुदतीत करारनामा न केल्यास त्याने जमा केलेली रक्कम शासनखाती जमा करण्यात येवुन करारनामा रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

27) मुख्यालयातील जिल्हा परिषद कार्यालयाच्या आतील व बाहेरील संपुर्ण स्वच्छता ही संडास बांथरुम व इतर साफसफाई सकाळी ७.३० ते ४.३० यावेळेत पुर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदाराने नेमलेले कामगारांना कार्यालयीन वेळेत प्रत्येक कार्यालयात उपस्थीत ठेवणे बंधनकारक राहील. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कर्मचारी यांनी सांगीतलेल्या स्वच्छतेची कामे करावी लागेल.

28) तसेच मुख्यालय परिसरातील सर्व महीला व पुरुष स्वच्छतागृह दिवसातुन दोन वेळा फीनाईल व इतर लिक्वीड ने स्वच्छ करावे लागेल. तसेच सुगंधीत औषधीचा वापर करावे लागेल परिसरात कोणतीही दुर्गंधी पसरता कामा नये यांची कंत्राटाराने साफसफाईचे साहीत्य यांवर होणारा खर्च हा कंत्राटदाराकडेच राहील.

29) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांचे कार्यालय समोरील आवारातील दररोज पाण्याच्या पोछाने फीनाईल लीक्वीडने पुसुन स्वच्छ करुन घ्यावे लागेल.

30) साफसफाई व स्वच्छते कामामध्ये कोणतीही दिरंगाई केल्याचे निर्दशनास आल्यास आपल्या देयकातुन १० टक्के रक्कम अतिरिक्त स्वरुपात कपात करण्यात येईल.

31) जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत कंत्राट दाराचा वर्ग – (CLASS-) नमुद करावा .

32) सन 2025-26 मध्ये मागील वर्षी शासकीय/निमशासकीय कार्यालयात साफसफाई करणे बाबतचा अनुभवाचे प्रमाणपत्र निविदा सादर करते वेळी सादर करणे आवश्यक राहील.

33) निविदाधारकाडुन साफसफाई करणारे कर्मचारी यांचा पत्ता/आधारकार्ड तसेच मोबाई क्रमांकासह चांगल्या वर्तणुकीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

34) महा. शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -32 यांचे पत्र क्र. झेडपीए-2017/ प्र.क्र.41/ वित्त-9/ दिनांक 13 जुलै 2017 व विक्रीकर आयुक्त महा. राज्य (जी.एस.टी.) यांचे परिपत्रक क्र. जेसी/ एचक्र.11/ जी.एस.टी./टिडीएस/सेक्शन 51/2017-18 / 455 मुंबई दिनांक 7/7/2007 व महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शा. परिपत्रक जी.एस.टी. 2017/ प्र.क्र. 81/कराधान-1/ दि.19/8/2017 चे निर्देशानुसार

Scanned with Cam

दि.1/7/2017 नंतर संबंधीत कंत्राटदाराची निविदा सदर करतांना शासनाने लागु केलेल्या जी.एस.टी. मुळे कंत्राटदारांना भरावयाच्या कराचा बोज्याचा विचार करुनच निविदा सादर करावी.

35) एजन्सीने **कामगार कंत्राट (नियमन व निर्मूलन) अधिनियम,** 1970, **किमान वेतन अधिनियम,** 1923, **वेतन देयक अधिनियम,** 1936, **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व विविध तरतुदी अधिनियम, कर्मचारी राज्य विमा अधिनियम,** 1948 तसेच शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेकडून लागू असलेले अथवा भविष्यात लागू होणारे इतर सर्व वैधानिक अधिनियम, नियम व विनियम, जे या करारास लागू असतील, त्यांचे पूर्णपणे पालन करणे व त्यांचे काटेकोरपणे अनुपालन करणे बंधनकारक राहील. वरील कायद्यांचे पालन न करणे अथवा त्यांचे उल्लंघन झाल्यास त्यातून उद्भवणारी कोणतीही जबाबदारी संपूर्णपणे एजन्सीची राहील.

36)

**(अ)** एजन्सीकडून नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी हे एजन्सीचेच कर्मचारी राहतील आणि त्यांचे वेतन, पगार, बोनस, उपदान (Gratuity), इतर कोणतेही भत्ते, रजेचा पगार, सुट्टीच्या दिवसांचे वेतन, नुकसान भरपाई, नोटीस वेतन इत्यादी बाबींकरिता जिल्हा परिषद अमरावती कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही.

**(ब)** किमान वेतन अधिनियम, 1923 मधील तरतुदीनुसार एजन्सीने नियुक्त केलेल्या कामगारांना साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक आहे. जर एजन्सीने अशा सुट्टीच्या दिवशी सेवा पुरविली तर संबंधित कामगारास भरपाई रजा अथवा त्या दिवसाचे वेतन देणे एजन्सीस बंधनकारक राहील. संबंधित कायद्याचे उल्लंघन होऊ नये तसेच जिल्हा परिषद अमरावती यांना गैरसोय होऊ नये म्हणून अशा प्रसंगी एजन्सीने पर्यायी मनुष्यबळाची व्यवस्था करावी.

**(क)** एजन्सीने आपल्या कामगारांची बायोमेट्रिक प्रणालीवर स्वतःच्या खर्चाने नोंदणी करावी व उपस्थितीची नोंद (Attendance Records) प्रत्येक महिन्याच्या देयका सोबत सादर करावी.

**(ड)** एजन्सीने पूर्णवेळ पर्यवेक्षक (Supervisor) नियुक्त करावा. त्याने कामगारांची उपस्थिती तपासणे, त्यांनी केलेल्या कामाची पाहणी करणे, आवश्यक संख्येने कामगार उपलब्ध ठेवणे, आवश्यक अभिलेख (Records) राखणे, प्रत्येक शनिवारी तसेच जिल्हा परिषद अमरावती यांच्या आवश्यकतेनुसार कर्तव्ये पार पाडणे बंधनकारक राहील.

**(ई)** सर्व शनिवारी करावयाची कामे विहितप्रमाणे व काटेकोरपणे पार पाडावीत. त्या दिवसांसाठी कोणतेही स्वतंत्र देयक अदा करण्यात येणार नाही, कारण त्या दिवसांचा नियमित उपस्थितीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**(एफ)** सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सेवा आवश्यक असल्यास एजन्सीने सेवा उपलब्ध करून द्यावी. अशा वेळी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सेवा पुरविल्यास संबंधित कामगारास भरपाई रजा अथवा त्या दिवसाचे वेतन देणे एजन्सीस मान्य राहील. संबंधित कायद्याचे उल्लंघन टाळण्यासाठी एजन्सीने पर्यायी मनुष्यबळाची व्यवस्था करावी.

37)

**(अ)** एजन्सीने आपल्या कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Provident Fund), कुटुंब निवृत्तीवेतन (Family Pension), कर्मचारी राज्य विमा (Employees' State Insurance) अंशदान, ठेव-संलग्न विमा योजना (Deposit Linked Insurance Scheme) तसेच लागू असलेली इतर सर्व वैधानिक देयके नियमितपणे भरावीत. तसेच कायद्यानुसार आवश्यक असलेले सर्व अभिलेख जतन करावेत आणि त्याबाबतची पावती पुढील महिन्याच्या देयकासोबत सादर करावी.

**(ब)** जिल्हा परिषद अमरावती यांना वरील बाबीं संदर्भातील तपशील एजन्सीकडून मागविण्याचा व पडताळणीसाठी सादर करण्यास सांगण्याचा अधिकार राहील.

Scanned with Cam

(क) जर कोणत्याही एजन्सीने सादर केलेला दर हा **मूलभूत वेतन (Basic Pay) + विशेष भत्ता (Special Allowance) + बोनस (लागू असल्यास) + भविष्य निर्वाह निधी (P.F.) अंशदान + कर्मचारी राज्य विमा (E.S.I.C.) अंशदान + शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लागू असलेले वैध वैधानिक कर** यांच्या एकूण रकमेपेक्षा कमी असेल, तर अशा एजन्सीचा दर/निविदा कोणतीही पुढील विचारणा न करता सरसकट फेटाळण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती. | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती. | कार्यकारी अभियंता<br>बांधकाम विभाग जि.प.अमरावती. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)<br>जिल्हा परिषद अमरावती. |

बंधपत्र

मी /आम्ही गांर्भीयपुर्वक नमुद करतो की, मी/आम्ही वर नमुद केलेल्या जिल्हा परिषद अमरावती मुख्यालया अंतर्गत सर्व कार्यालये जिल्हा परिषद अमरावती व शिक्षणाधिकारी/ समग्र शिक्षा अभियान/कृर्षी / मा.मु.का.अ.निवास्थानामधील कार्यालय क्रं २ व परिसरातील साफसफाई करणे निविदाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या आहेत.या निविदेसाठी माझे /आमचे दर निविदेसोबत असलेल्या BOQ FILE मध्ये नमुद करीत आहे/आहोत.जर माझी/आमची निविदा स्विकृत करण्यात आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधील राहु. या निविदेतील अंटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्ती मध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहु. या निविदेतील सर्व अटी व शर्ती मला/आम्हास मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक :

निविदाधारकाची सही व शिक्का

नांव-----------------------

पत्ता -----------------------

Scanned with Cam

प्रति,

मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद अमरावती.

विषय — जिल्हा परिषद अमरावती करीता हाऊस कीपिंग आणि क्लीनिंग सेवा पुरविण्यासाठी निविदा सादर करणे.

महोदय,

मी/आम्ही तुमच्या दैनिक-वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार (दिनांक - : ) "साफसफाई व कचरा व्यवस्थापन सेवा" सर्वसाधारण साफसफाईचे करीता ११ कर्मचारी यांची सेवांसाठी दर खालीलप्रमाणे सादर करत आहे/आहेत.

| अ.क्रं. | विवरण | दर प्रती महीना (प्रती पुरुष/ महीला) |
|---|---|---|
| १ | मुळ वेतन | 10000 |
| २ | विशेष भत्ता | 7208 |
| ३ | एकुण | 17208 |
| ४ | ई.पी.एफ. १३% | 2237 |
| ५ | ई.एस.आय.सी. ३.२५ % | 559 |
| ६ | सेवा शुल्क | ठेकेदाराने ऑनलाईन BOQ मध्ये भरावयाचे |
| ७ | एकुण रुपये | 20004 |
| ८ | केंद्रीय विक्रीकर **(CGST @ 9%)** | 1800 |
| ९ | राज्य विक्री कर **(SGST @9%)** | 1800 |
| १० | साहीत्य खर्च प्रती महीना | ठेकेदाराने ऑनलाइन BOQ मध्ये भरावयाचे |
| ११ | एकुण | |

वर नमूद केलेले दर **किमान वेतन अधिनियमानुसार (Minimum Wages Act)** आहेत आणि यात सर्व भत्ते, कर, बोनस, ग्रेच्युइटी, शुल्क, ई.पी.एफ., केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने लावलेले सर्व कर/शुल्क यांचा समावेश आहे. सेवा कर एजन्सीने भरावा आणि मासिक बिलासोबत चलान सादर करावे.

मी/आम्ही निविदेत पान क्र. १ ते १९ पर्यंत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती वाचल्या आहेत आणि त्या अटी मान्य आहेत.

जर केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्राधिकरण इ. द्वारे कोणत्याही प्रकारचे कर, शुल्क, दर, वेतन किंवा इतर जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली, तर ती रक्कम भरण्याची जबाबदारी मी/आम्ही स्वीकारतो/स्वीकारतो आणि यासाठी जिल्हा परिषद, अमरावती ही " सर्वसाधारण साफसफाईचे करीता जबाबदार राहणार नाही.

दिनांक —

आपला विश्वासु

(ठेकेदाराचे नाव)
(शिक्का / सील)

Scanned with Cam

प्रति,

मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद अमरावती.

विषय – जिल्हा परिषद अमरावती करीता हाऊस कीपिंग आणि क्लीनिंग सेवा पुरविण्यासाठी निविदा सादर करणे.

महोदय,

मी/आम्ही तुमच्या दैनिक वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार (दिनांक - : ) "साफसफाई व कचरा व्यवस्थापन सेवा" सर्वसाधारण साफसफाईचे करीता 4 कर्मचारी यांची सेवांसाठी दर खालीलप्रमाणे सादर करत आहे/आहेत.

| अ.क्रं. | विवरण | दर प्रती महीना (प्रती पुरुष/ महीला) |
|---|---|---|
| 1 | मुळ वेतन | 10000 |
| 2 | विशेष भत्ता | 7208 |
| 3 | एकुण | 17208 |
| 4 | पुर्ण कालीक सफाई गारांसाठी किंवा मेहतरांसाठी निश्चिती केलेल्या एकुण वित्तलब्धीच्या (मुळवेतन व विशेष भत्याच्या) ६० टक्के | 10325 |
| 5 | ई.पी.एफ. १३% | 1342 |
| 6 | ई.एस.आय.सी. ३.२५ % | 335 |
| 7 | सेवा शुल्क | ठेकेदाराने ऑनलाईन BOQ मध्ये भरावयाचे |
| 8 | एकुण रुपये | 12002 |
| 9 | केंद्रीय विक्रीकरं (**CGST @ 9%**) | 1080 |
| 10 | राज्य विक्री कर (**SGST @9%**) | 1080 |
| 11 | साहीत्य खर्च प्रती महीना | ठेकेदाराने ऑनलाइन BOQ मध्ये भरावयाचे |
| 12 | एकुण | |

वर नमूद केलेले दर **किमान वेतन अधिनियमानुसार (Minimum Wages Act)** आहेत आणि यात सर्व भत्ते, कर, बोनस, ग्रेच्युइटी, शुल्क, ई.पी.एफ., केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने लावलेले सर्व कर/शुल्क यांचा समावेश आहे. सेवा कर एजन्सीने भरावा आणि मासिक बिलासोबत चलान सादर करावे.

मी/आम्ही निविदेत पान क्र. १ ते १९ पर्यंत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती वाचल्या आहेत आणि त्या अटी मान्य आहेत.

जर केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्राधिकरण इ. द्वारे कोणत्याही प्रकारचे कर, शुल्क, दर, वेतन किंवा इतर जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली, तर ती रक्कम भरण्याची जबाबदारी मी/आम्ही स्वीकारतो/स्वीकारतो आणि यासाठी जिल्हा परिषद, अमरावती ही " सर्वसाधारण साफसफाईचे करीता जबाबदार राहणार नाही.

दिनांक –

आपला विश्वासु
(ठेकेदाराचे नाव)
(शिक्का / सील)

Scanned with Cam